**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ५०/२०१९** **दिनांक २१/०६/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. अशोककुमार चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२३७३३९६

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १५/०६/२०१९ ते २१/०६/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २२/०६/२०१९ सकाळी ८:३० पासून २६/०६/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१५/०६** | **१६/०६** | **१७/०६** | **१८/०६** | **१९/०६** | **२०/०६** | **२१/०६** | | **२२/०६** | **२३/०६** | **२४/०६** | **२५/०६** | **२६/०६** |
| ४७.० | ५.० | ०.० | ०.० | १५.४ | २.० | ०.० | **पाऊस (मिमी)** | ३ | १५ | ४५ | १७ | ८ |
| ३३.६ | ३२.४ | ३३.० | ३३.० | ३१.४ | ३२.० | ३३.४ | **कमाल तापमान (अं.से)** | ३३ | ३३ | ३२ | ३२ | ३३ |
| २४.० | २७.४ | २७.४ | २७.८ | २५.६ | २६.४ | २६.४ | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २५ | २४ | २३ | २४ |
| ८ | १ | २ | १ | २ | १ | १ | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ६ | ५ | ८ | ६ | ३ |
| ९२ | ८७ | ८५ | ८५ | ९५ | ८८ | ८४ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ८१ | ८१ | ८९ | ८८ | ८४ |
| ८७ | ७३ | ७५ | ८३ | ७५ | ६४ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ५३ | ५२ | ५८ | ७१ | ६२ |
| ९.६ | ९.५ | १०.३ | १०.३ | ६.६ | ३.८ | ३.७ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ६ | ९ | १२ | ९ | ११ |
| वा.ऊ. | ई.ऊ. | ई.ऊ. | ई.ऊ. | ई.ऊ. | वा.ऊ. | वा. | **वाऱ्याची दिशा** | नै. | प. | नै.प. | द. | नै.द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ६९.४ | १००.६ | २३५९.६ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २२ ते २६ जून, २०१९ पर्यंत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून आकाश मेघाच्छादित राहील.**

**दिनांक २० ते २७ जून, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा कमी राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **रोपवाटीका** | • पेरणी केलेल्या भात रोपवाटिकेला पाण्याचा ताण बसत असल्यास रोपवाटिकेला पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• बांधावरील खेकड्यांचा बंदोबस्त करावा त्यासाठी १ किलो शिजलेल्या भातामध्ये ७५ टक्के पाण्यात मिसळणारी ॲसिफेट पावडर ७५ ग्रॅम टाकून विषारी अमिष तयार करावे. या मिश्रणाच्या साधारणपणे १०० गोळ्या तयार करून प्रत्येक बिलाच्या आत तोंडाशी एक गोळी ठेवावी व बीळ बुजवावे, दुसऱ्या दिवशी जी बिळे उकरली जातील अशा बिळात परत अमिष वापरावे. |
| **नागली** | **रोपवाटीका** | • पेरणी केलेल्या नागली रोपवाटिकेला पाण्याचा ताण बसत असल्यास रोपवाटिकेला पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **भात, नागली, वरी** | **रोपवाटीका** | • पाऊसाची उघडीप असल्यामुळे रोपवाटीकेतील भात, नागली आणि वरी पिकांच्या रोपांवर लष्करी अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्यामुळे रोपवाटिकेचे दररोज निरीक्षण करावे. या किडीच्या अळ्या दिवसा जमिनीत लपून राहतात आणि रात्रीच्या वेळी अळ्या बाहेर येवून रोपवाटिकेत जमिनीलगत रोपे कापून खातात तसेच पाने कडेपासून मध्याशिरेपर्यंत खातात. किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी सायंकाळच्या सुमारास वारा शांत असताना डायक्लोरव्हॉस ७६ टक्के प्रवाही १.३ मि. ली. प्रति लिटर पाण्यातून फवारावे.<br>• (सूचना: सदर कीटकनाशकाला या किडीच्या नियंत्रणासाठी लेबल क्लेम नाहीत.) |
| **भाजीपाला/ फळबाग रोपवाटीका** | **रोपवाटीका** | • भाजीपाला पिकांच्या रोपवाटिकेला पाण्याचा ताण बसत असल्यास पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **कुकुटपालन** | **-** | • कोंबड्यांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच शेड मध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**